# १. समानार्थी शब्द

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

एकमेकींच्या संपर्कात येणाऱ्या भाषा एकमेकींकडून कितीतरी शब्दांची, वाक्प्रचारांची देवाणघेवाण करत असतात. मराठी भाषेतही उर्दू, अरबी, फारसी, कानडी या भाषांबरोबर संस्कृत, प्राकृत या प्राचीन भाषांमधूनही आलेले अनेक शब्द आढळतात. साहजिकच एका शब्दाऐवजी अनेक शब्द एकाच गोष्टीचा निर्देश करतात.

उदा. सूर्य = मित्र, भास्कर, हिरण्यगर्भ, मिहिर, आदित्य, दिनकर, भानू, सविता, दिनमणी, सहस्ररश्मी असे अनेक शब्द आढळतात.

कथा/कादंबरी विशेषतः कविता या साहित्यप्रकारांमध्ये असे शब्द आढळतात. त्यामुळे भाषेला सौंदर्य प्राप्त होते. भाषेत नावीन्य येते. प्रासयुक्त रचना साधता येते.

**पुढे समानार्थी शब्दांची यादी दिली आहे. शब्दार्थांप्रमाणेच याही शब्दांचा उलटसुलट अशा दोन्ही दिशांनी अभ्यास करणे आवश्यक आहे.**

## अं

**अंगकाठी** – अंगबांधा, अंगयष्टी, शरीरयष्टी

**अंगविक्षेप** – हावभाव, हातवारे

**अंगार** – विस्तव, निखारा, इंगळ

**अंजली** – ओंजळ

**अंत** – शेवट, समाप्ती, मृत्यू, अखेर

**अंतःकरण** – अंतर्याम, ह्रदय, मन

**अंतर** – स्थलावकाश, कालावकाश, खंड, फरक, विपरीतपणा, भेदभाव, तफावत, मन

**अंतर्धान** – अदृश्य, लुप्त

**अंतर्भेदी** – घरभेद्या, फितूर

**अंदाज** – कयास, तर्क, अदमास, अटकळ, अनुमान

**अंधार** – काळोख, तिमिर, अंधकार, तम

**अंधेरनगरी** – अराजकता, बेबंदशाही, बजबजपुरी

**अंतरिक्ष** – आकाश, आतील बाजू

## अ

**अकंटक** – निष्कंटक, संकटरहित, अजातशत्रू, निर्विघ्न

**अकट** – आग्रही, हट्टी, चिकट, चेंगट, हेकेखोर, हेकट

**अकटोविकट** – प्रचंड, अवाढव्य, बेढब, अगडबंब; भयप्रद, भयानक, अक्राळविक्राळ; अत्यल्प

**अक्कड** – ऐट, डौल, नखरा, दिमाख, गर्व, ठसका, रुबाब, तोरा, घमेंड, पीळ, अवडंबर

**अकांचन** – निष्कांचन, निर्धन, गरीब, दीन, अकिंचन, निराश्रित, दीनवाणा, लाचार, कफल्लक,

रंक, भणंग, विपन्न, कंगाल, अगतिक

**अकृत्रिम** – नैसर्गिक, सहज, खरे, स्वाभाविक, अंगीभूत, स्वयंभू

**अखंड** – अभंग, सलग, एकसंध, अविच्छिन्न, संपूर्ण, अख्खा, अक्षत

**अगडबंब** – लठ्ठ, धिप्पाड, अवजड, जडशीळ, भारी, स्थूल, बोजड, जड

**अगत्य** – आस्था, आपुलकी, कळवळ, कळकळ, काळजी, आवर्जून

**अग्र** – टोक, कळस, शेंडा, दशी, अंचळी, आगरडा, अरोसा, श्रेष्ठ, कळस, शिरोभाग, उच्च, प्रथमस्थान

**अगाध** – अथांग, गहन, खोल, अमर्याद, अपार, गंभीर, प्रगाढ, अगम्य

**अग्रणी** – मुख्य, नायक, मार्गदर्शक, पुढारी, नेता, अग्या, अग्रेसर, अध्वर्यू , अग्रवर्ती, अग्रिम

**अग्नी** – विस्तव, पावक, वन्ही, वैश्वानर, आग, आगेल, हुताशन, ज्वाला, अंगार, वडवानल, वणवा, जाळ, अग्निशिखा

**अघ** – पाप, दोष, गुन्हा, अपराध, अधम

**अघटित** – असंभाव्य, विलक्षण, लोकोत्तर, अपूर्व, नवलपूर्ण, चमत्कारिक, अद्‌भुत, अजब, अभूतपूर्व

**अघोर** – अचाट, भयंकर, अमंगल, भीतिदायक, राक्षसी, वाईट, दारुण, आसुरी, गर्हणीय

**अचपळ** – खोडकर, चंचल, तरतरीत, चैतन्यपूर्ण, गतिमान

**अचरट** – वाह्यात, अयोग्य, अविचारी, व्रात्य, बावळट, खोडकर

**अचाट** – फार, अतिशय, विलक्षण, फाजील, भलतेच, अजब, अमानवी, अतिमानवी, बेफाट, बेसुमार, पराकोटी

**अचानक** – अनपेक्षित, अकस्मात, एकाएकी, नवचित, आकस्मिक, अकल्पित, कर्मधर्मसंयोग, भावित

**चेत** – अचेतन, जड, चैतन्यरहित, निर्जीव, प्राणरहित, चैतन्यहीन, निष्प्राण, निपचित, निश्चे

**अछोडा** – कासरा, दोर, चाबूक, दावण, दा लगाम, रस्सी, नाडा, वादी, रज्जू, सुंभ, प्रत्यंचा

**अजंगम** – स्थावर, न हलणारे, अचल

**अजर** – वृद्धत्वहीन, शाश्वत, अविनाशी, चिरत

**अजस्त्र** – मोठा, प्रचंड, विस्तृत, अवाढव्य, महाकाय, अगडबंब, स्थूल

**अजिंक्य** – दुर्भेद, दुर्लंघ्य, अजेय, अपराजित, अदम्य, दुर्दमनीय, अजित, अमोघ

**अटकर** – १. बांधेसूद, नीटनेटका, प्रमाणबद्ध, नीटस, सुबक २. हट्टी

**अटकळ** – अजमास, अंदाज, तर्क, नियम, रूढ, रीत, भाकीत, ठोकताळा, आडाखा, स्थूलमान, होरा

**अटकाव** – अडथळा, प्रतिरोध, अडकाठी, प्रतिबंध, मज्जाव, अडसर, व्यत्यय, अटकाव, अवरोध, खळ मनाई, हरकत, अडवणूक, बाधा, पेच, खोळंबा, अटक

**अट्टाहास** – आग्रह, अत्याग्रह, हेका, मोठ्याने हसणे, आक्रोश

**अटंग** – अवाढव्य, अफाट, विस्तीर्ण

**आठवण** – ध्यान, स्मरण, स्मृती, धारणा

**अठवर** – अविवाहित

**अडक** – आडनाव, कुलनाम, उपनाव

**अडगा** – अडाणी, अशिक्षित, अज्ञ

**अडबंद** – कटिसूत्र, करदोटा, करदोडा, करधनी

**अतिथी** – पाहुणा, पांथस्थ, अनाहूत मनुष्य, अभ्यागत, सोयरा

**अतिरेक** – बेसुमार, कळस, पराकाष्ठा, अमर्याद

**अत्यंत** – अतिशय, असंख्य, अमित, अगणित, अपरिमित, अपार, असीम, पुष्कळ, अमर्याद, अपरंपार, अफाट

**अथवा** – अगर, वा, किंवा

**अथिमाय** – बायल्या, नामर्द

**अथिलेपण** – थोरपण, भाग्य, सामर्थ्य

**अद** – अर्धा, निम्मा

**अद्भुत** – अपूर्व, आश्चर्यकारक, चमत्कारिक, विलक्षण

**अद्वातद्वा** – विसंगत, असंबद्ध, भरमसाठ

**अध:पतन** – खाली पडणे, नरकास जाणे

**अधम** – नीच, हलका, क्षुद्र, क्षुल्लक, दुष्ट, अधर्मी

**अधमर्ण** – कर्जदार, ऋणी, देणेदार

**अधांतरी** – हवेत, अंतराळात, निराधार, निरालंब, त्रिशंकू स्थिती

**अधाशी** – हावरा, लोभी, खादाड, हपापलेला, बुभुक्षित, हलकट, अधोड

**अधिकार** – सत्तास्थान, जबाबदारीची जागा, प्रभुत्व, हक्क, अमल, ताबा, हुकमत, आधिपत्य, स्वामित्व, प्रभुसत्ता, प्रभुता

**अधिपती** – स्वामी, धनी, मालक, अधीश, राजा

**अधिष्ठान** – वास, निवास, वास्तव्य

**अधिक्षेप** – निंदा, दूषण, हेटाळणी

**अधीर** – उतावीळ, चंचल, अस्थिर, अनर्गल, स्वच्छंदी

**अधू** – व्यंग असलेला, कुरूप, पंगू, अईबदार, अपंग

**अधोगती** – पतन, दुर्गती, अवनती, अध:पात, अपकर्ष, अध:पतन, ऱ्हास, उतरती कळा

**अध्यात्म** – आत्म्याबद्दलचे ज्ञान, ब्रह्मज्ञान, वेदान्त, परमात्म्याविषयी ज्ञान, अद्वैत

**अध्याय** – खंड, पर्व, विभाग, प्रकरण

**अध्रुव** – अल्पकालिक, चंचल, क्षणभंगुर

**अनंग** – अंगरहित, निराकार, मदन, कामदेव, शिव, शंकर

**अनर्थ** – अरिष्ट, संकट, अर्थहीनता, निरर्थक, अर्थशून्य

**अनशन** – उपवास, निराहार, अन्नत्याग

**अनसूया** – मत्सराशिवाय, अत्रिपत्नी

**अनाठायी** – अयोग्य, तर्कविरहित

**अनाड** – अडाणी, उनाड, द्वाड

**अनाथ** – पोरका, आईवडिलांशिवाय, दीन, निराश्रित, निराधार, असाहाय्य

**अनिल** – वायू, वारा, अष्टवसूंपैकी एक

**अनावर** – अनिर्बंध, मोकाट, उच्छृंखल, अनियंत्रित, निरंकुश, बेछूट, बेफाम, बेभान

**अनुकंपा** – दया, करुणा, कृपा

**अनुक्रम** – परंपरा, ओळ, पद्धत

**अनुक्रमणिका** – क्रमवार यादी, सूची

**अनुकूल** – फायदेशीर, उपकारी, इष्ट, पथ्यकारक, उपकारक, हितकारक

**अनुध्वनी** – अनुभूती, प्रत्यय, प्रचिती, प्रत्यंतर, प्रतीती, साक्षात्कार, आस्वाद, प्रत्यक्ष ज्ञान

**अनुमोदन** – पसंती, मान्यता, कबुली, संमती, सहमती, दुजोरा, होकार, समर्थन, पाठिंबा, पुष्टीकरण, स्वीकृती

**अनुरक्त** – इच्छायुक्त, अनुरागी, प्रेमबद्ध, आसक्त

**अनुरूप** – सुसंगत, जुळणारे, शोभणारे, यथायोग्य, यथोचित

**अनुशासन** – आज्ञा, कायदा, नियम, व्यवहार

**अनुशीलन** – परिशीलन, हव्यास, आसक्ती

**अनुषंग** – संगती, भागीदारी, सोबत

**अन्वय** – संबंध, आधार, संयोग

**अन्वेषण** – शोध, संशोधन, चौकशी

**अपकार** – इजा, नुकसान, दु:ख, दुष्कृत्य

**अपजय** – पराजय, पराभव

**अपमान** – अनादर, मानभंग, अप्रतिष्ठा, अवज्ञा, अवमान, मानहानी, अवहेलना, तेजोभंग, बेइज्जत, मानखंडना, उपहास, उपमर्द, पाणउतारा

**अपंग** – व्यंग, लुळा, विकल, पंगू, विकलांग, दिव्यांग, पांगळा

**अपत्य** – मूल, संतान, संतती

**अपभ्रंश** – विकार, नाश, हानी, मूळ भाषेतील

शब्दाची विकृती
**अपरोक्ष** – साक्षात, समक्ष, प्रत्यक्ष
**अपहार** – उचलेगिरी, लाचलुचपत, आर्थिक अफरातफर, फसवणूक, गंडवणे
**अपक्षय** – ऱ्हास, उतार, क्षय
**अप्रतिम** – अजोड, अद्वितीय, अतुल्य, अनुपम, अतुलनीय, उत्कृष्ट, अलौकिक, असामान्य
**अफवा** – कंडी, वाती, भुमका, वदंता, वावडी, खोटी बातमी, आवई, कीवदंती, गावगप्पा
**अभद्र** – वाईट गोष्ट, अरिष्ट
**अभिजात** – कुलीन, सभ्य, थोर, प्रतिष्ठित, जातिवंत, सुसंस्कृत, अस्सल, विशुद्ध
**अभिधान** – नाव, उल्लेख, अर्थबोध
**अभिनय** – हावभाव, अंगविक्षेप, सोंग, नक्कल, अनुकरण
**अभिनव** – नवीन, नूतन, अपूर्व, नवे, आधुनिक
**अभिभव** – पराभव, पराजय
**अभिमत** – प्रिय, संमत, पसंत
**अभिमान** – गर्व, ताठा, तोरा, मान
**अभियोग** – खटला, फिर्याद, आरोप, आळ, दोष; मनन, अभ्यास, चिकाटी
**अभिरुची** – चव, गोडी, आवड, विशेष रुची
**अभिलाषा** – इच्छा, हेतू, लोभ, हाव
**अभिवादन** – नमस्कार, प्रणिपात, नमन, वंदन
**अभिवृद्धी** – वाढ, उत्कर्ष, भरभराट, प्रगती, उन्नती, उत्थान, वर येणे, उदय
**अभिशाप** – आरोप, आळ, ठपका, शाप, निंदा, बट्टा
**अभ्यास** – व्यासंग, सराव, परिपाठ
**अभ्युदय** – उत्कर्ष, भरभराट, उत्थान
**अमंगल** – अशुभ, अनिष्ट, खराब
**अमानुष** – मानवी कर्तृत्वाबाहेरचे, दैवी, स्वर्गीय, हिंसक, अद्‌भुत, अमानवीय
**अभाळ** – शुद्ध, स्वच्छ, शुभ्र
**अमीर उमराव** – सरदार मंडळी, बडे लोक, वैभव...
**अमोघ** – अचूक, योग्य, गुणदायी, रामबाण, प्रभावी
**अमृत** – सुधा, पीयूष, संजीवनी
**अयनक** – चष्मा, उपनेत्र, आरसा, दर्पण, काच, आयना
**अयस** – लोखंड, पोलाद
**अर्बुद** – राकट, आडदांड, खेडवळ; दशकोटी
**अर्धचंद्र** – उचलबांगडी, गचांडी, उच्चाटन, हकालपट्टी
**अरण्य** – जंगल, रान, वन, विपिन, कान्तार, अडऊ, अटवी, अडव, कानन
**अरि** – शत्रू, वैरी, दुष्मन, टोचणी
**अरिष्ट** – संकट, अशुभ गोष्ट, दुर्दैव
**अरुवार** – कोमल, नाजूक, मृदू, सुंदर, अळुमाळु
**अर्चना** – पूजा, अर्चा, उपासना, सेवा
**अर्जुन** – पाच पांडवांपैकी तिसरा, पार्थ, धनंजय, फाल्गुन, जिष्णू, भारत, विजय, किरीट
**अर्थात** – कारणामुळे, ओघानेच
**अर्वाचीन** – अलीकडचा, हल्लीच्या काळातील
**अर्वाच्य** – नीच, हलकटपणाचे भाषण
**अलंगनौबत** – डंका, निशाण, पहारा
**अलिंद** – ओटा, देवडी, गोपुर
**अलिप्त** – वेगळे, निराळे, निर्मळ, असंलग्न, उदासिन, तटस्थ
**अल्क** – क्षार, खार
**अल्लड** – अननुभवी, कच्चा, अप्रौढ, अज्ञानी, अपक्व बुद्धिचा
**अवकळा** – अवदशा, तेजोहीन, नि:सत्त, दुर्दशा
**अवकाश** – अवधी, वेळ, समय, सवड, रिकामी जागा, काल, सवड, भेद, वेगळेपणा, विलंब, सामर्थ्य, आकाश
**अवकृपा** – गैरमर्जी, राग, नाखुषी
**अवगुंठन** – वेष्टन, बुरखा, लपेटा
**अवडंबर** – भपका, डौल, देखावा, डामडौल

स्तोम, प्रस्थ, थाटमाट, आडंबर, अविर्भाव

**अवधात** – उनाड, खोडकर, हट्टी, अवचित्या, खोडसाळ, अवखळ, अवलक्षणी

**अवनती** – अपकर्ष, दुस्थिती, दुर्दशा

**अवबोध** – ज्ञान, जागृती, जाणीव

**अवलोकन** – निरीक्षण, पाहणी

**अवशिष्ट** – बाकी, उरलेले, उर्वरित, शेष

**अविदग्ध** – अडाणी, मूर्ख, मूढ, अज्ञानी

**अव्याहत** – अबाधित, अखंड, अविरत, अखंडित, निरंतर, अक्षय

**अशक्त** – रोडका, दुर्बल, क्षीण, कमजोर, दुबळा, कमकुवत, शक्तिहीन, बलहीन, सामर्थ्यहीन

**अशाश्वत** – क्षणभंगुर, क्षणिक

**अशिष्ट** – असभ्य, लज्जास्पद

**अशुभ** – अमंगलपणा, शुभ नसलेले, अनिष्ट, पातक, अभद्र

**अश्व** – घोडा, हय, तुरग, तुरंग, वारू, वाजी, अस्प

**अश्लाघनीय** – निंद्य, अप्रशंसनीय, अशिष्ट, अभ्य

**अश्वत्थ** – पिंपळाचे झाड

**अष्टौप्रहर** – रात्रंदिवस, सतत, अहर्निशी

**असमंजस** – बुद्धिहीन, अविवेकी, अविचारी, मूर्ख

**असामी** – इसम, व्यक्ती, माणूस, प्रतिष्ठित व्यक्ती

**असुर** – दैत्य, राक्षस, दानव

**असुरवाड** – दुःख, क्लेश, त्रास

**असूया** – मत्सर, हेवा, द्वेष

**अस्त** – अंतर्धान, लोप, शेवट

**अस्तमान** – मावळणे, अस्ताची वेळ

**अहमहमिका** – स्पर्धा, चढाओढ

**अहाणा** – उखाणा, कोडे, म्हण

**अहिवा** – अविधवा, सुवासिनी, सौभाग्यवती, अहेव, सवाष्ण, आयाव, सधवा

## आ

**आई** – माता, जननी, माय, माऊली, मातोश्री, जन्मदात्री, आऊस, अंबा

**आकर्षक** – मोहक, मनोहर, मनोवेधक, ओढ, खेच

**आकर्षण** – मोह, ओढा, भुलावा, मोहिनी

**आकांत** – कोलाहल, आरडा-ओरड, आक्रोश, आक्रंदन, कल्लोळ, विलाप, हंबरडा

**आकाश** – आभाळ, गगन, अंबर, अस्मान, नभ, अंतरिक्ष, व्योम, ख, वितान, वियत, तारांगण

**आकाशवाणी** – नभोवाणी

**आकांक्षा** – इच्छा, अभिलाषा, वांच्छा, आशा, कांक्षा, मनीषा, मनोकामना, कामना

**आखूड** – तोटके, आकुंचित, अपुरे, लहान, त्रोटक

**आक्रमण** – हल्ला, चढाई, उल्लंघन

**आख्यान** – गोष्ट, कथा, कहाणी

**आख्यायिका** – दंतकथा, जनश्रुती

**आगतस्वागत** – आदरसत्कार, पाहुणचार, पावनेर

**आगमनिर्गम** – आरंभ व शेवट, येणे-जाणे

**आगर** – शेत, मळा, खाण

**आगळीक** – कळ, कुरापत, कागाळी, खोडी

**आग्रही** – निग्रही, हट्टी, हेकेखोर, जिद्दी

**आघात** – तडाखा, प्रहार, धक्का, ठोसा,

**आंच** – झळ, धग, शेक, झगरं

**आचरण** – वागणूक, वर्तणूक, वर्तन, आचार, चालचलणूक

**आचारसंपन्न** – आचारशील, सद्वर्तनी, सदाचारी

**आचरट** – फाजील, व्रात्य, खोडकर

**आचारभ्रष्ट** – दुराचारी, दुर्वर्तनी, अनाचारी

**आचार्य** – उपाध्याय, पुरोहित, पंडित, गुरूजी

**आच्छादित** – आवृत, व्याप्त, झाकलेले

**आजार** – व्याधी, रोग, दुखणे, अनारोग्य, अस्वास्थ्य

**आजीव** – तहहयात, जन्मभर, आयुष्यभर, आजन्म

## इ

**इंद्र** – नाकेश, शक्र, देवेंद्र, पुरंदर, वासव, वज्रपाणि, अमरेंद्र, अमराधिपती
**इच्छा** – अभिलाषा, आकांक्षा, कामना, मनीषा, वासना, स्पृहा
**इजा** – अपाय, पीडा, उपद्रव
**इज्जत** – अब्रू , प्रतिष्ठा, मान
**इतःपर** – यापुढे, यानंतर, अतःपर
**इतमाम** – सरंजाम, थाट, व्यवस्था
**इति** – अखेर, शेवट, समाप्ती, इतिश्री
**इमानी** – प्रामाणिक, इमानदार
**इन्कार** – नापसंती, नाकबुली, निषेध, नकार
**इहलोक** – मृत्युलोक

## ई

**ईर्षा** – हेवा, असूया, मत्सर; चुरस, स्पर्धा, चढाओढ, प्रतियोगिता, अहमहमिका
**ईश्वर** – परमेश्वर, देव, भगवान, सर्वसाक्षी, ईश, प्रभू, परमात्मा, परब्रह्म, सर्वेश्वर, अनंत, अजन्मा, निर्गुण, निराकार, सर्वव्यापी, महाप्रभू, निर्विकार, जगन्नियंता
**ईहा** – इच्छा, लालसा, स्पृहा, आकांक्षा, अपेक्षा, अभिलाषा

## उ

**उकाडा** – रतीब, उष्मा, गर्मी
**उक्ता** – घाऊक, ठोकळ
**उगवती** – प्राची, पूर्व
**उग्र** – भयानक, भेसूर, भयंकर, रौद्र, तापट, रागीट; उग्रट, तीव्र, दुःसह
**उगा** – गप्प, फुकट, व्यर्थ, उगीच
**उंच** – उन्नत, उत्तुंग, उच्च, बुलंद, ताडमाड, भव्य
**उंची** – नामी, मौल्यवान, दर्जेदार, सरस, शारीरिक लांबी
**उथव** – भरती
**उचलबांगडी** – हकालपट्टी, उच्चाटन, अर्धचंद्र
**उचापत** – उठाठेव, भानगड, उपद्व्याप
**उचित** – योग्य, लायक
**उच्छाद** – उपद्रव, त्रास, गांजणूक; खोड्या
**उच्छृंखल** – उद्दाम, स्वेच्छाचारी, स्वच्छंद, स्वैर
**उच्छेद** – विनाश, नायनाट, विध्वंस
**उज्ज्वल** – सतेज, चकचकीत; स्वच्छ, शुद्ध, पवित्र
**उणे** – कमीपणा, न्यूनता, दोष, व्यंग, अपूर्णता, न्यून
**उतारचढ** – क्षयवृद्धी, उत्कर्षापकर्ष, उंचसखलपणा
**उतारवय** – वार्धक्य, वृद्धावस्था, वृद्धत्त्व, म्हातारपण
**उतारू** – प्रवासी, वाटसरू, मुसाफिर, पांथस्थ, यात्रेकरू
**उत्कंठा** – उत्कट इच्छा, आशा, उत्सुकता, आवड, आतुरता
**उत्कर्ष** – भरभराट, चलती, वाढ, समृद्धी, संपन्नता
**उत्तमर्ण** – धनको, सावकार
**उत्सुकता** – उत्कंठा, उतावळेपणा, आतुरता, जिज्ञासा
**उदात्त** – उच्च, श्रेष्ठ, मोठा, उदार
**उदासीन** – विरक्त, खिन्न, दुःखी, निष्काळजी, बेपर्वा, तटस्थ, चिंताक्रांत
**उद्धट** – उर्मट, दांडगा, उद्दाम, असभ्य
**उद्धव** – उत्साह, आनंद
**उद्यान** – बाग, बगीचा, उपवन, वाटिका
**उदाहरण** – नमुना, दाखला, दृष्टान्त, मासला, मिसाल, वानगी
**उद्योग** – धंदा, व्यवसाय, उद्यम, उदीम, काम

उनाड - भटक्या, स्वैर, जंगली, रानटी, उन्मादी
उन्माद - कैफ, धुंदी, भ्रम, वेड, माज, उन्मत्तता
उन्मूलन - उपटणे, नाश, उच्छेद
उमराव - सरदार, मानकरी, श्रेष्ठ, अमीर
उन्मत्त - गर्विष्ठ, उद्धट, उद्दाम, उर्मट, चढेल, दांडगा, मुजोर
उपोषण - उपवास, उपास, अनशन, फाका, निराहार, लंघन
उपद्रवी - त्रासदायक, अनर्थकारक, खोडकर, व्रात्य
उपनयन - व्रतबंध, मौजीबंधन, मुंज
उपमर्द - मानखंडना, मानहानी, मानभंग, तेजोभंग, नाचक्की, पाणउतारा, अपमान
उपसंहार - शेवट, समाप्ती, सिंहावलोकन
उषःकाल - पहाट, प्रभात
उषा - संधिप्रकाश, पहाट
उसनवट-वारी - उधारी, कर्ज, ऋण
उसासा - दीर्घ श्वास, सुस्कारा
उस्ताद - अध्यापक, शिक्षक; निपुण, कुशल

## ऊ

ऊंधा - उलटा, विरुद्ध, उफराटा
ऊर्ण - लोकर, तंतू , धागा
ऊब - उष्णता, आधार, सुख
ऊर्मी - तरंग, लहरी, प्रवाह, वाट
ऊहापोह - विवेचन, वाटाघाटी, चर्चा, विचारविनिमय

## ऋ

ऋषी - मुनी, बैरागी, संन्याशी, तापसी, साधू, तपस्वी, योगी
ऋण - कर्ज; वजा करणे
ऋणदार - देणेकरी, ऋणको, ऋणाईत, कर्जदार

## ए

एककल्ली - हट्टी, एकमार्गी, हेकेखोर, हट्टाग्रही
एकचित्त - एकाग्र, एकमानता
एकला - एकाकी, एकटा
एकात्मता - एकपणा, एकमेळ, एकत्व, तादात्म्य
एकी - एकमती, ऐक्य, एकवाक्यता, एकजूट, संघटन, एकता, जूट, एकाव
एलकी - चमक, उसण

## ऐ

ऐट - अक्कडबाजी, दिमाख, डौल, छानछोकी, तोरा, नखरा, ताठा, मिजास, रुबाब
ऐदी - आळशी, मंद, जड, सुस्त
ऐवज - संपत्ती, रक्कम, रोकड, मालमत्ता, द्रव्य
ऐश्वर्य - वैभव, समृद्धी, श्रीमंती, संपदा; वर्चस्व, प्रभुत्व

## ओ

ओंगळ - किळसवाणा, अमंगळ, वाईट, घाणेरडा, अशुभ
ओकारी - वांती, उलटी, वमन; त्रास, तिटकारा, वीट
ओघ - ओढा, प्रवाह, लोंढा, पाट, ओझर, झरा, नाला
ओज - चैतन्य, उत्साह, तेज
ओझर - धार, पाझर, पाट
ओटी - ओचा, पदर, पोट, सोपा (ओसरी)
ओढणी - अवगुंठन

**कोट** – तट, अंगात घालावयाचा कोट
**कोडगा** – निर्लज्ज, निलाजरा
**कोंडा** – भुगा, भुसा, चुरा, तूस
**कोता** – आखूड, अपुरा, कमी, क्षुद्र
**कोंभ** – तुरा, अंकुर, मोड
**कोमल** – नाजूक, मऊ, मृदू, कोवळे, सुकुमार
**कोर** – कडा, तुकडा
**कोरडा** – शुष्क, रसहीन, द्रवहीन, रखरखीत, सुका, निरर्थक, भावनाहीन (माणूस), सुका, चाबकाचा फटकारा
**कोळी** – मासे पकडणारा, एक प्रकारचा कीटक
**कौतुक** – आश्चर्य, नवल, आनंद
**कैवारी** – बाजू घेणारा, साह्यकर्ता
**कोश** – आच्छादन, म्यान, खजिना, आतला भाग, शब्दसंग्रह, माहितीचा खजिना
**कौशल्य** – चातुर्य, खुबी, नैपुण्य, कसब, प्रावीण्य

## ख

**खंत** – खेद, खिन्नता
**खंदा** – पाणीदार, साहसी, धाडसी, सामर्थ्यवान
**खग** – पक्षी, विहंग, द्विज, अंडज
**खगोल** – आकाशकटाह, नक्षत्रखचित, अंतरिक्ष
**खच** – ढीग, भर, थर, रास, गर्दी, दाटी
**खर्च** – व्यय, विनियोग, वेच
**खचित** – निश्चित, खात्रीपूर्वक; खरोखर, नक्की, निःसंदेह; जडित
**खजिना** – कोष, भांडार, कोषागार, भांडागार, सरकारी जमा, संग्रह; कारंजाचा हौद
**खजील** – लज्जित, ओशाळा, शरमिंदा
**खटका** – भांडण, बेबनाव, वाद, खडाजंगी, कडी
**खट्याळ** – १. खट, तुसडा, तिरसट, वाईट २. खोडकर, हट्टी
**खटला** – भांडण, कज्जा
**खडतर** – कठीण, त्रासदायक, उग्र
**खडाजंगी** – बोलाचाली, भांडण, खडाष्टक, शत्रुत्व, दुश्मनी, उभदावा, हाडवैर
**खप्पड** – सुरकुतलेला, चिंबलेला, क्षीण
**खबरदारी** – काळजी, संभाळ, बंदोबस्त, दक्षता, सावधगिरी
**खमंग** – रुचकर, स्वादिष्ट, चविष्ट, चवदार
**खरडपट्टी** – कानउघडणी, वात्ताडन
**खरमरीत** – प्रखर, खणखणीत, स्पष्ट
**खरोखर** – खरे पाहता, वस्तुतः, यथार्थतः वास्तविक, निश्चित
**खवास** – सरदार, उमराव, मानकरी
**खाचा** – खांड, कंगोरा, खोबण, खांच
**खाट** – बाज, बाजले, खाटले
**खार** – लवण, मीठ, सैंधव
**खाष्ट** – द्वाड, दुष्ट, नतद्रष्ट, खट
**खिडकी** – गवाक्ष, वातायन, जाळी, झरोका
**खीर** – पायस, लापशी
**खुमारी** – लज्जत, गोडी, माधुरी
**खुलासा** – विवरण, स्पष्टीकरण, तपशील, उलगडा
**खुशाल** – खुशी, सुखरूप, आनंदी, प्रसन्न, कुशल, क्षेम
**खुळा** – मंद, जडबुद्धी, बेअकली, अक्कलशून्य, वेडा, वेडपट, बावळट, वेडसर, अर्धवट, निर्बुद्ध, मूर्ख, भावरा
**खूण** – चिन्ह, निशाणी, संकेत
**खून** – वध, हत्या, ठार मारणे
**खेडे** – ग्राम, गाव
**खेद** – वैषम्य, विषाद
**खेप** – चक्कर, येरझारा, फेरी, वारी, खेपाटा
**खेळ** – क्रीडा, स्पर्धा, डाव, सामना, लीला, नाटक
**खेडूत** – गावकरी, ग्रामस्थ
**खोंड** – तरुण बैल, गोऱ्हा, पाडा
**खोसर** – जीर्ण, फुटका, खोकर

**गुलामगिरी** – दास्य, परवशता, पराधीनता, पारतंत्र्य
**गुह्य** – रहस्य, गुपित, बिंग, गुप्त, गूढ, प्रच्छन्न
**गृह** – घर, सदन, भवन, भुवन, निकेत, निकेतन, आलय, निलय, गेह
**गृहस्थ** – गृहस्थाश्रयी, कुटुंबवत्सल
**गृहकलह** – भाऊबंदकी, यादवी, अंतःकलह
**गोंडस** – सुंदर, सुरेख, गोजिरवाणा
**गोतावळा** – गोत्रज, सगेसोयरे, भाऊबंद
**गौर** – गोरा, शुभ
**गोषवारा** – सारांश, संक्षेप, तात्पर्य
**ग्रामस्थ** – गावकरी, ग्रामवासी
**ग्लानी** – मूर्च्छा, घेरी

## घ

**घट** – १. घडा, घागर २. तूट, नुकसान, घस, खोट
**घटस्फोट** – लग्नविच्छेद, काडीमोड
**घनघोर** – निबिड, तुंबळ, भयंकर
**घनदाट** – गर्द, गहन, निबीड
**घमेंडखोर** – आढ्यतेखोर, बढाईखोर, गर्विष्ठ, अभिमानी, अहंकारी, चढेल, मग्रूर
**घर** – गृह, निवास, सदन, गेह, आलय, धाम, निलय, आगार, निकेतन, भवन, हवेली, बंगला, वास्तू
**घस** – तूट, खोट, बूड, नुकसान, तोटा, घाटा
**घसारा** – झीज, तूट, घट
**घाई** – त्वरा, जलदी, धांदल, तातडी, शीघ्रता
**घर्म** – घाम, स्वेद
**घळ** – भेग, खाचन, ओहळ, लवण, गुहा
**घालमेल** – धांदल, दगदग, तारांबळ, उद्व्याप, गोंधळ, घोटाळा
**घायकुतेपणा** – उतावळेपणा, अधीरता
**घाव** – वध, ठार मारणे, उच्छेद, संहार, प्रहार, मारा, घाव, तडाखा
**घुमा** – मुखस्तंभ, अबोल, मुखदुर्बळ, मुखजड, दुर्मुख
**घोडा** – हय, वारू, अश्व, तुरग, तुरंगम, वाजी
**घोर** – काळजी, चिंता, फिकीर, विवंचना, घनदाट, निबिड, तुंबळ
**घोष** – गर्जना, गजर
**घोंगडी** – कांबळे, घोंगडे
**घ्राणेंद्रिय** – नाक, घ्राण, नासिका

## च

**चंगळ** – १. वैपुल्य, रेलचेल, लयलूट, समृद्धी २. चैन, मजा
**चंचल** – १. अस्थिर, विचलित, लहरी २. अशाश्वत
**चंद्र** – इंदु, चंद्रमा, चांद, कलानिधी, कलाधर, चांदोबा, निशानाथ, राकेश, विधु, शशी, सुधांशू, शशांक, सोम, निशिकांत, रजनीकांत, कुमुदनाथ, सुधाकर, विभाकर
**चंद्रिका** – ज्योत्स्ना, चांदणे, कौमुदी, चंद्रप्रकाश
**चकणा** – काणा, तिरळा
**चक्रम** – तऱ्हेवाईक, विलक्षण
**चक्रवर्ती** – छत्रपती, सम्राट, राजाधिराज
**चपखल** – नीट, तंतोतंत, बरोबर, ठाकठीक, नेमका, साजेसा
**चपराक** – थप्पड, चापट
**चमत्कारिक** – विलक्षण, अद्‌भुत, अजब, आश्चर्यकारक
**चर** – जंगम, हलता, चलनक्षम
**चरण** – पाय, पाद
**चरितार्थ** – उपजीविका, उदरनिर्वाह, योगक्षेम
**चर्चा** – वादविवाद, ऊहापोह, विचारविमर्श, विचारमंथन, बोलणी

**पर्वत** – नग, अभी, शैल, गिरी, अचल, अद्री, डोंगर, मेरू, भूधर, धराधर, धरणीधर, महीधर, भूमीधर, अचल

**पराणी** – हत्यारी, आर, टोचणी

**पत्नी** – अर्धांगिनी, बायको, कांता, दारा, जाया, आर्या, कलत्र, वामांगी, सहचरी, गृहस्वामिनी, गेहिनी

**पक्षी** – खग, विहग, द्विज, अंडज, पाखरू

**पर** – पीस, परका

**पय** – पाणी, दूध

**पक्ष** – बाजू, पंधरवडा, पंख

**पल्लव** – पालवी, कोवळे पान

**पृथ्वी** – धरणी, अवनी, भूमी, धरती, वसुंधरा, क्षया, धरा, भूरसा, धरित्री, मही, वसुधा

**पवित्र** – पावन, पाक, निर्मळ, मंगल, शुची, शुद्ध, सात्त्विक

**पराक्रम** – शौर्य, पुरुषार्थ, मर्दुमकी, बहादुरी

**परीक्षा** – कसोटी, पारख, चाचणी, तपासणी, दिव्य, कस

**प्रचिती** – अनुभव, पडताळा, प्रत्यय

**प्रकाश** – उजेड, आलोक

**प्रगल्भ** – गंभीर, शहाणा, प्रौढ, पक्व

**प्रचंड** – विशाल, अजस्र, अवाढव्य

**प्रताप** – पराक्रम, विक्रम, शौर्य, बहादुरी

**प्रघात** – रिवाज, पद्धत, चाल, रीती

**प्रवीण** – निपुण, कुशल, पटू, तरबेज, हुशार

**प्रबंध** – व्यवस्था, योजना, तजवीज, संयोजन, दीर्घलेखन

**प्रसिद्ध** – प्रख्यात, नामांकित, ख्यातनाम, विख्यात

**प्रेम** – प्रीती, लोभ, अनुराग, अनुरक्ती, स्नेह

**प्रतिज्ञा** – नेम, पण, शपथ, वचन

**प्रतिमा** – प्रतिबिंब, छबी

**प्रतिष्ठा** – मानमरातब, लौकिक

**पान** – पल्लव, पर्ण, पत्र, दल, पत्री

**पाणी** – जल, अंबू, पय, उदक, जीवन, सलिल, वारी, नीर, तोय, आप

**पावन** – पवित्र, निर्मळ, शुद्ध

**पाय** – पद, पाद, चरण, पाऊले

**पारंगत** – निपुण, कुशल

**पात्र** – १. लायक, योग्य २. व्यक्तिरेखा, नाटकात काम करणारी व्यक्ती

**पार** – पलीकडे, कट्टा

**पाठ** – पाठ करणे, शरीराची मागील बाजू

**पाट** – बसण्याचा पाट, पाण्याचा पाट, विवाहाचा प्रकार

**पार्वती** – उमा, दुर्गा, गौरी, कन्याकुमारी, काली, अपर्णा, सती, भवानी

**पारितोषिक** – बक्षीस, इनाम

**पाथरवट** – दगडफोड्या

**पाऊस** – वर्षा, पर्जन्य

**पारिपत्य** – पराभव, शिक्षा, दंड

**पाप** – पातक, कुकर्म, दुरित, दुष्कृत्य

**पुण्य** – सुकृत, सत्कर्म, श्रेयस

**प्रवासी** – वाटसरू, पांथ, पांथस्थ

**प्रारब्ध** – दैव, नशीब, ललाट

**प्राण** – जीव, आत्मा

**प्राचीन** – पूर्वीच्या काळातील, जुने

**प्रासाद** – वाडा, मंदिर

**पितर** – पूर्वज, माता-पिता

**पीत** – पिवळा, पिणे या क्रियापदाचे रूप

**पुत्र** – सुत, तनय, आत्मज, नंदन, मुलगा, तनुज, बेटा

**पुढारी** – नायक, नेता, अग्रणी, धुरीण, म्होरक्या

**पुरुष** – नर, मर्द

**पूर** – नगर, नदी व ओढे यांना येणारा पूर

**पूर्व** – १. पूर्वीचा २. एक दिशा

**पैसा** – दाम, द्रव्य, धन

**पोपट** – राघू, रावा, शुक

**बिकट** – कठीण, अवघड, मुश्किल
**बिलंदर** – पक्का, अट्टल, बदमाष
**बुटका** – गिड्डा, आखूड, ठेंगणा
**बुद्धिगम्य** – बुद्धीने जाणता येण्याजोगे
**बुद्धी** – मती, अक्कल, मेधा, प्रज्ञा
**बेडूक** – मंडूक, भेक
**बैल** – खोंड, पोळ, वृषभ
**बोकड** – बकरा, अज
**बोलभांड** – भांडण्याच्या कामात पटाईत, भांडखोर

## भ

**भंगुर** – नश्वर, क्षणिक, अशाश्वत
**भंजन** – मोड, विध्वंस, निर्दालन
**भक्कम** – बळकट, मजबूत, कणखर, दणकट, दृढ
**भला** – चांगला, सज्जन
**भरपूर** – पुष्कळ, रगड, चिकार, प्रचुर, विपुल, उदंड, मुबलक
**भरभराट** – उत्कर्ष, प्रगती, समृद्धी
**भांडण** – कलह, वाद, झगडा, तंटा, कज्जा
**भाव** – १. भक्तिभाव, श्रद्धा २. वस्तूचा दर
**भाऊ** – भ्राता, बंधू, सहोदर, अग्रज, अनुज
**भांडखोर** – कलागती, कलभांड, तंटेबाज, कलहप्रिय, कलागत्या
**भूषण** – अलंकार, आभरण, दागिना, लेणे
**भुरळ** – मोहिनी, भ्रम, मोह, गारुड, मंत्रमुग्धता
**भुंगा** – भ्रमर, अलि, मिलिंद, मधुप, भृंग, मधुकर, बंभर
**भुवई** – भ्रुकुटी, भिवई
**भूक** – बुभुक्षा, क्षुधा
**भेट** – गाठ, आलिंगन, नजराणा, मुलाखत
**भोवळ** – घेरी, चक्कर, भोवड, मूर्च्छा, मूर्च्छना
**भोळा** – साधा, भाबडा, निष्कपटी, निर्मत्सरी

## म

**मंगल** – पवित्र, शुभ
**मदत** – साहाय्य, साह्य
**मगर** – सुसर, नक्र
**मग्रूर** – गर्विष्ठ, चढेल, उर्मट, उद्दाम, उद्धट, मुजोर, उन्मत्त
**मनोरंजन** – अनुरंजन, करमणूक
**मजल** – पल्ला, टप्पा
**मच्छ** – मासा, मत्स्य, मीन
**मजकूर** – हकिकत, वृत्तांत, बातमी
**मजूर** – गडी, कष्टकरी, कामकरी, श्रमिक
**मजा** – गंमत, मौज
**मज्जाव** – निर्बंध, मनाई, अटकाव, आडकाठी
**मनोरथ** – मनातील इच्छा
**मनुष्य** – माणूस, मानव, मानुष, मनुज
**महान** – थोर, मोठा, प्रचंड, भव्य, विशाल, श्रेष्ठ, ज्येष्ठ, विराट, गुरू, महा
**महात्मा** – महानुभाव, महापुरुष, महामना, महात्मन
**मरणोन्मुख** – आसन्नमरण, मुमूर्षू
**मन** – चित्त, मानस, अंतःकरण, अंतरंग
**मग्न** – तल्लीन, दंग, चूर, गुंग
**मयंक** – चंद्र
**मशाल** – दिवटी, हिलाल
**मर्मभेद** – रहस्याचा स्फोट
**मर्दुमकी** – शौर्य, पराक्रम, विक्रम, साहस
**महिना** – मास, माह
**माकड** – मर्कट, वानर, कपि, शाखामृग
**माणूस** – मनुष्य, मनुज, मानव, मानुष, नृ, नर
**माग** – तपास, थांग, छडा
**माया** – दया, कृपा, मायाळू, प्रेम, वात्सल्य
**मासा** – मत्स्य, मीन
**मारुती** – वायुपुत्र, पवनपुत्र, हनुमान, महावीर, बजरंग

**राजा** – भूप, नृप, नरेश, भूपाल, पृथ्वीपती, भूपती, नृपती, प्रजापती, महिपती, अवनीपती, बादशाह, राया, राणा

**राणी** – राज्ञी, राजपत्नी, सम्राज्ञी, महाराणी, महाराज्ञी

**राक्षस** – रात्रिचर, असुर, दानव, दैत्य, निशाचर

**राग** – क्रोध, संताप, रोष, कोप, त्वेष

**राबता** – वर्दळ, ये–जा

**रिता** – रिकामा, रिक्त, मोकळा

**रुकार** – होकार, संमती, मान्यता

**रूढ** – प्रचलित, चालू, प्रघात

**रुणझुण** – मंजूळ आवाज, वाळ्यातील घुंगरांचा आवाज

**रेडा** – हल्या, टोणगा, महिष

**रोग** – व्याधी, पीडा, विकार, उपद्रव

**रोख** – कल, झोक, उद्‌देश्य, धोरण

**रौनक** – सौंदर्य, शोभा, चमक

**रोमांच** – काटा, शहारे, पुलक

## ल

**लंपट** – आसक्त, कामुक

**लकब** – पद्धती, धाटणी, ढब, शैली

**लख्ख** – स्पष्ट, ठसठशीत, झगमगीत

**लगत** – समीप, जवळ, निकट, सन्निध

**लता** – वेल, वल्लरी, लतिका, कुंज, वल्ली

**लय** – क्षय, नाश, निःपात

**लज्जत** – रुची, स्वाद, गोडी

**लढाई** – युद्ध, समर, रण, संगर, संग्राम, द्वंद्व

**लवण** – मीठ, क्षार, खार

**लक्ष्मी** – श्री, रमा, कमला, इंदिरा, वैष्णवी, पद्मा, पद्मिनी

**लघुता** – लहान, कमीपणा

**लहान** – कनिष्ठ, छोटा, लघु, सान, बाल्य, बारीक, सान

**लावण्यवती** – रूपवती, देखणी, सुंदर, सरूप, सुरूप, रूपवान

**लाटा** – तरंग, लहर

**लाचार** – लीन, दयनीय, दीन

**लांच्छन** – डाग, कलंक, बट्टा

**लावण्य** – सौंदर्य, सुंदरता

**लालसा** – इच्छा, अभिलाषा, आकांक्षा, कांक्षा, स्पृहा

**लाक्षणिक** – सांज्ञिक, सांकेतिक

**लिंपण** – लेप, सारवण, लेपन, थापण

**लोकसत्ताक** – प्रजासत्ताक, लोकमतानुवर्ती

**लोखंड** – आय, लोह, अयस्व

**लोकोत्तर** – श्रेष्ठ, अलौकिक, असामान्य, असाधारण

**लौकिक** – कीर्ती, प्रसिद्धी, बोलबाला, गाजावाजा

## व

**वंचना** – प्रतारणा, फसवणूक, लबाडी, ठकबाजी, लुचेगिरी

**वंश** – कुल, गोत्र, जाती

**वक्तृत्व** – वाकपाटव, वाक्चातुर्य

**वकील** – प्रतिनिधी, मुखत्यार, बाजू मांडणारा, विधिज्ञ

**वखार** – कोठार, गुदाम

**वय** – उमर, वर्ष, साल

**वत्सल** – दयाळू , कृपाळू , प्रेमळ

**वदंता** – बोलवा, अफवा, जनवार्ता, कंडी, जनश्रुती

**वंदन** – प्रणाम, नमस्कार, अभिवादन, प्रणिपात

**वमन** – वांती, ओकारी, उलटी

**वर्दी** – निरोप, बातमी

**वस्त्र** – पट, अंबर, वसन, कपडा

**वनराज** – सिंह, केसरी, पंचानन, मृगेन्द्र, मृगराज

**सतत** – निरंतर, अविश्रांत, अविरत, सदोदित, सदा, अखंड, सदैव, अनवरत
**सत्कार** – मानसन्मान, मानमरातब, आदरसत्कार
**सशक्त** – बलवान, बलिष्ठ, ताकदवान, शक्तिमान
**सुविद्य** – चांगला शिकलेला
**समुद्र** – सागर, अर्णव, दर्या, सिंधू, रत्नाकर, उदधी, जलधी, वारिधी, सरित्पती, अपांपती, जलनिधी, पयोधी, पयोनिधी
**सह्याद्री** – सह्य पर्वत, सह्याचल, सह्यगिरी
**सत्यानाश** – उच्छेद, विनाश, निःपात, नायनाट
**सफर** – प्रवास, यात्रा
**सत्वर** – लवकर, जलद, ताबडतोब, शीघ्र, त्वरित
**सर्प** – भुजंग, तक्षक, साप, विषधर, उरग, आशीविष
**सराई** – हंगाम, सुगी
**सकल** – समस्त, सर्व, अखिल, निखिल, संपूर्ण
**सदाचार** – चांगले आचरण, चांगले वर्तन
**समन्वय** – जोडणी, मिलाप, मेळ, जोड
**समाचार** – वार्ता, बातमी, हल्ला, परामर्श
**सनातन** – शाश्वत, चिरकाल, अव्याहत, अबाधित
**सरी** – पावसाच्या धारा, गळ्यातील दागिना
**सरस्वती** – शारदा, विद्यादेवी, भारती, सावित्री, वाणी, वेदमाता, ब्राम्ही, वीणावादिनी, हंसवाहिनी, श्वेतवाहिनी
**सृष्टी** – चराचर, विश्व, संसाररूपी सागर, निसर्ग
**स्नान** – आंघोळ, न्हाण, मज्जन
**स्वागत** – आदरसत्कार, आदरातिथ्य
**स्नेह** – मैत्री, मित्रत्व, सख्यत्व
**सेतू** – पूल, साकव, साकेत, सोपान
**स्वेच्छा** – स्वतःची इच्छा
**स्वार्थी** – मतलबी
**साधू** – संत, बैरागी, ऋषी, मुनी, तपस्वी
**साचर** – खरा, खरोखर, खराखुरा
**साहस** – धाडस, धारिष्ट्य

**सामील** – समाविष्ट, अंतर्भूत
**सारंग** – हत्ती, गज, कुंजर
**सावध** – दक्ष, जागृत, जागरूक
**सार** – १. तात्पर्य २. भोजनातील एक प
**सिद्ध** – तयार, सज्ज
**सिंह** – केसरी, पंचानन, मृगेंद्र, वनराज, म
**सीता** – जानकी, वैदेही, मैथिली
**सीमा** – मर्यादा, हद्द, शीव
**स्त्री** – ललना, महिला, वनिता, नारी, क प्रमदा, भामिनी, दारा
**सुरेल** – गोड सुरात, सुस्वर
**सुंदर** – मनोहर, अभिराम, सुरेख, रमणीय,
**सुलक्षण** – चांगले लक्षण
**समूह** – समुदाय, टोळी, संघ, दल, जमाव
**सुकाळ** – विपुलता, रेलचेल
**सुचिन्ह** – चांगले चिन्ह
**सुगंध** – सुवास, परिमल, सौरभ
**सुरुवात** – प्रारंभ, आरंभ, श्रीगणेशा, आदी
**सूर** – श्रवणीय आवाज, स्वर
**सूत** – १. धागा, दोरा २. सारथी
**सूर्य** – मित्र, भास्कर, दिनकर, आदित्य, भ प्रभाकर, सविता, दिनमणी, रवी, मार्तंड, अ दिवाकर, अंशुमाली, चंडांशु, हिरण्यगर्भ
**सेवा** – शुश्रूषा, चाकरी, नोकरी, परिचर्या
**सोने** – सुवर्ण, कनक, कांचन, हेम, हिरण्य
**सोमट** – कोमट, कोंबट, ऊन
**सैनिक** – शिपाई, जवान
**सैन्य** – सेना, कटक
**सौख्य** – सुख, समाधान
**सौंदर्य** – लावण्य, सुरूपता, स्वरूपता, सुंदरता
**सौकर्य** – सुलभता, सुकरपणा
**स्वर्ग** – देवलोक, सुरलोक, देवपुरी